# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम- ३४ /२०२०**

**तक्रारकर्ता श्री. हेमराज भिमकचंद झव्हेरी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
पायधुनी विभाग, आर.एस.सप्रे मार्ग, मुंबई -४०० ००२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-२)**
दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत, एस टी एस इमारत आवार
सर. जे. जे. मार्ग, नागपाडा, मुंबई-०२७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १९.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००१२५९ प्रकरणी आयोगाने दि.१४.०५.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय उपलब्ध माहिती / सुस्पष्ट उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (६) अन्वये निशुल्क पुरवावी."*

उक्त आदेशानुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग, मुंबई यांच्याकडून दि. ०७.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. १२.०६.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करून असे नमूद केले की मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन), लो. टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयास जा.क्र. ४०५४/२०२०, दि. २९.०२.२०२० अन्वये सादर केली होती. सहाय्यक जन माहिती अधिकारी, तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन), लो.टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांचकडून सादर करण्यात केलेली माहिती या कार्यालयाचा जा.क्र. १८०/२०२२, दि. २९.०२.२०२२ अन्वये अर्जदार यांना पुरविण्याकरीता तयार करण्यात आलेली होती. सदरची माहिती घेऊन जाणेबाबत अर्जदार यांना कळविले असता, अर्जदार हे या कार्यालयात हजर राहिले नाहीत. यास्तव सदरची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर जतन करून ठेवण्यात आलेली होती. अर्जदार यांना माहिती न मिळाल्याने, अर्जदार यांनी मा.राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांचे कार्यालयात दि. १४.०१.२०२० रोजी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरोधात तक्रार अर्ज सादर केला होता. "प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांना

कळवून देखील अर्जदार हे माहिती घेऊन जाणेकरीता हजर राहिले नाहीत. तरी, मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे." "तक्रारदार यांना पुन्हा संपर्क करून त्यांनी मागितलेली माहिती घेवून जाणेकरीता कळविले असता, ते दि. ११.०६.२०२५ रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात हजर राहिले होते. त्यांना अभिलेखावर जतन करून ठेवण्यात आलेली माहिती पाहणी करीता दिली असता, त्यांनी संपुर्ण कागदपत्रांची पडताळणी केली व माहिती अपुर्ण असल्याचे कारण सांगून माहिती स्विकारण्यास नकार दिला आहे."

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ११.०६.२०२५ रोजी कार्यालयात बोलावून काही माहिती दाखविली होती. परंतु त्यांना अपेक्षित पूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. तक्रारकर्ता यांनी सादर केले की, त्यांना केसर बुलियन दुकानाचे सीसीटिव्ही फुटेज, त्यांनी माहिती अर्जात दिलेले दूरध्वनीचे कॉल डिटेल्स, केसर बुलियन व श्री. अंबे ज्वेलर्स यांच्या बँक खात्याची माहिती पाहिजे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, ज्या दूरध्वनी क्रमांकाचे CDR अहवाल उपलबध होत, त्याचा अहवाल पाठविण्यात आलेला आहे. बाकीच्या दूरध्वनी क्रमांकाचा CDR अहवाल अभिलेखावर उपलब्ध नाही. केसर बुलियन यांच्या बँक खात्याचा तपशिल व सीसीटीव्ही फुटेज त्यांच्या अभिलेखात उपलब्ध नाही.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन आणलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली आणि अपिलार्थी यांनी ती स्विकारली.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित अधिकच्या माहितीविषयी वस्तुस्थितीदर्शक उत्तर ७ दिवसात पाठवून पुढील सुनावणीस अनुपालन अहवालासह उपस्थित राहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २६.०६.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

प्रदीप 13-6-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १३.०६.२०२५**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३४/२०२०
## तक्रारकर्ता श्री. हेमराज भिमकचंद झव्हेरी
## सुनावणी दिनांक : २६.०६.२०२५ (In continuation of order dt १३.०६.२०२५)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित अधीकच्या माहितीविषयी वस्तुस्थितीदर्शक उत्तर ७ दिवसांत पाठवून पुढील सुनावणीस अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २५.०६.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, दि.२०.०६.२०२५ चे पत्रासह दि. १८.०६.२०२५ चे पत्र जोडून अधिकची माहिती तक्रारकर्ता यांना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

प्रदीप व्यास 27-6-2025

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**